# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- www.dydepune .com


(1)

**अत्यंत महत्त्वाचे**

**ई-मेल**

जा.क्र. .शिउसं/उमाशि-४०२/वै.मान्यता शिबीर/२०१७

दिनांक :- 01 NOV 2017

प्रति,

सर्व प्राचार्य/प्राचार्या,
अनुदानित, कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय :-दिनांक ०२ मे २०१२ ते १९.०७.२०१४ अखेर अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त केलेल्या शिक्षण सेवक वैयक्तिक मान्यतेबाबतचे प्रस्ताव तात्काळ सादर करणेबाबत ..**

**संदर्भ :-१)मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/बैठक/१७/११२० दि. २०.०३.२०१७**
**२)मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/बैठक/१७/११६७ दि. २१.०३.२०१७.**
**३) या कार्यालयाचे पत्र दिनांक १२.०४.२०१७**
**४) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/नाहप्र/१७/७२४८ दि. १८.१०.२०१७.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, पुणे विभागातील उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालया मधील ०२ मे २०१२ नंतर नियुक्त उच्च माध्यमिक शिक्षकांच्या नियुक्ती मान्यता देणे व वेतन अदा करणेबाबत शासन स्तरावर बैठका झालेल्या आहेत, अशा प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घेण्याकरिता दि.०२मे २०१२ ते १९.०७.२०१४ या कालावधीत नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या मान्यतेबावतची नस्ती व यादी संचालनालयास तात्काळ सादर करावयाचे निर्देश या कार्यालयास देणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील दि. ०२ मे २०१२ ते १९ जुलै २०१४ पर्यंत अनुदानित तुकडीवर नियुक्ती केलेल्या शिक्षकांचे वैयक्तिक मान्यता प्रस्ताव तात्काळ या कार्यालयात दिनांक ०६.११.२०१७ रोजी श्री. जगताप के.जी. वरिष्ठ लिपीक, यांच्याकडे समक्ष सादर करावेत. सदरचे प्रस्ताव आवक-जावक शाखेत परस्पर जमा करु नयेत.

दिनांक ०२ मे २०१२ ते १९.०७.२०१४ या कालावधीत नियुक्त केलेल्या शिक्षकांना मान्यता देण्याबाबत सोवत जोडलेल्या तपासणी सूचीनुसार व **पुणे- हिरवा, अहमदनगर-लाल, सोलापूर-पिवळा या रंगातील नस्तीमध्ये** प्रस्ताव सादर करावा. जे कनिष्ठ महाविद्यालय ,सोबत जोडलेल्या तपासणी सूची प्रमाणे प्रस्ताव सादर करणार नाहीत, असे प्रस्ताव मा. शिक्षण संचालनालयास सादर केले जाणार नाहीत.

दिनांक ०६.११.२०१७ रोजी या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला नाही, आणि या कालावधीत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त केलेला शिक्षक वैयक्तिक मान्यतेपासून वंचित राहिल्यास किंवा या

Scanned by CamScanner

अनुषंगाने भविष्यात न्यायालयीन प्रकरणी उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

**सोबत :- तपासणी सूची**

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे-१

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे/अहमदनगर/सोलापूर यांनी आपल्या नोटीस बोर्डावर सदर प्रत डकविण्यात यावी व आपल्या अधिनस्त असलेल्या सहा.शिक्षण उपनिरीक्षक यांना आपल्यास्तरावरुन सर्व प्राचार्य यांना सदरबाबत कळविण्यात बाबत सूचना देण्यात याव्यात.

Scanned by CamScanner

# तपासणी सूची (संबधित कॉलम बाबत पुरक कागदपत्र सोबत जोडावे)

(B)

१) पदाबाबतचा तपशिल :-

| अ.क्र. | विषय | विषय | दिनांक | पान.क्र |
|---|---|---|---|---|
| १ | पद कसे निर्माण झाले याचा तपशिल (प्रस्तावित मंजुर पद/सेवानिवृत्तीमुळे /निधनामुळे/बदलीमुळे/राजीनाम्यामुळे) | | | |
| २ | शिक्षकाचे नांव :- | | | |
| ३ | प्रस्तावित पद मंजुर असल्यास या कार्यालयाचे पद मंजुरी पत्र /शासन निर्णय | | | |
| ४ | बदली झाली असल्यास बदली झालेल्या शिक्षकाचे बदली आदेश व शिक्षक मान्यता प्रत | | | |
| ५ | आकस्मिक निधनामुळे पद रिक्त झाले असल्यास मुत्यूचा दाखला व शिक्षक मान्यता प्रत | | | |
| ६ | सेवानिवृत्तीमुळे पद रिक्त झालेले असल्यास सेवानिवृत्ती शिक्षकाचे सेवासमाप्ती आदेश व शिक्षक मान्यता प्रत | | | |

**२) संच मान्यता सांख्यिकी माहिती (सोबत संच मान्यता प्रत शैक्षाणिक वर्षानुसार छायांकित प्रत जोडावी)**

| वर्ष | मंजुर पुर्णवेळ पदांची संख्या | मंजुर अर्धवेळ पदांची संख्या | मंजुर प्र.घ.ता. पदांची संख्या | एकुण पदांची संख्या (२+३+४) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २०१२-१३ | | | | |
| २०१३-१४ | | | | |
| २०१४-१५ | | | | |
| २०१५-१६ | | | | |
| २०१६-१७ | | | | |

**३) कर्मचा-यांची वैयक्तिक माहितीचा तपशिल :-**

| अ. क्रं. | शिक्षण सेवकाचे नांव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | विषय | कार्यभार घ.ता. | मानधन | नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |



Scanned by CamScanner

४) नस्ती मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिलः- (फ्लॅग लावणे)

| अ.क्र. | तपशिल | आहे | नाही | पान क्र |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य यांचे पत्र | | | |
| २ | जन्म दिनांक (जन्म दाखला किंवा इ. १० वी बोर्डाचे प्रमाणपत्र) | | | |
| ३ | नाहरकत प्रमाणपत्र | | | |
| ४ | जाहिरात जोडणे (दैनिक वर्तमानपत्राची मूळ कॉपी) | | | |
| ५ | मुलाखत उपस्थित पत्र (उमेद्वाराच्या स्वाक्षरीसह) | | | |
| ६ | निवड समिती अहवालाची प्रत | | | |
| ७ | संस्था ठराव क्र व दिनांक (संस्था ठराव, इतिवृत्ताच्या मुळ प्रतीत किती नंबर पानांवर नमुद केलेला आहे त्याचा पान क्रमांक) | | | |
| ८ | नियुक्ती आदेश क्र व दिनांक (शिक्षक/शिक्षण सेवक) | | | |
| ९ | रुजु अहवाल, हमीपत्र | | | |
| १० | जातीचा दाखला (प्रवर्गासह) | | | |
| ११ | जात वैधता प्रमाणपत्र | | | |
| १२ | नॉनक्रिमीलीअर प्रमाणपत्र (इमाव, एनटी-१,२,३ प्रवर्गासाठी) | | | |
| १३ | **शै. व व्यावसायिक पात्रता**<br>१) पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक | | | |
| | २) पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक | | | |
| | ३) व्यावसायिक पात्रता पदवी (बीएड) प्रमाणपत्र व गुणपत्रक (आवश्यक ठिकाणी उदा.नांव, विषय व गुण / टक्केवारी पिवळया हायलाईटर ने हायलाईट करावे) | | | |
| १४ | संच मान्यता (२०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७) | | | |
| १५ | अनुकंपा, अपंग आरक्षण, न्यायप्रविष्ठ प्रकरणे तक्रारी इ संस्थेचे प्रमाणपत्र | | | |
| १६ | मा. सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) पुणे/नाशिक यांनी तपासणी केलेला जुना व नवीन मागासवर्गीय अनुशेष तक्ता (१०० टक्के बिंदु नामावली) | | | |
| १७ | रोष्टर नुसार असलेला संवर्ग | | | |
| १८ | संस्थेत / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अतिरिक्त शिक्षक नसलेबाबतचे हमीपत्र | | | |
| १९ | पुर्णवेळ शिक्षण सेवकाच्या /शिक्षकांच्या नियुक्तीबाबत भविष्यात काही तक्रारी अथवा न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधीत प्राचार्यांची असेल असे हमीपत्र | | | |
| २० | प्रस्तावात सादर केलेली संपुर्ण माहिती ही खरी व प्राचार्य यांनी स्वतः तपासली असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे, त्याचप्रमाणे माहिती खोटी आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे. | | | |
| २१ | सादर केलेल्या नस्ती मधील सर्व पानांना पान क्रमांक नमुद करुन एकुण पानांची संख्या नमुद करावी. त्याप्रमाणे पहिल्या पानावर अनुक्रमणिका व तपासणीसूची जोडावी | | | |
| २२ | नस्ती मध्ये सदरची तपासणी सुची सुरुवातीस लावणे आवश्यक आहे. | | | |

Scanned by CamScanner